PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# राजर्षी शाहू महाराजांचे सक्तीचे शिक्षण

**जितेंद्र शंकरराव वाघ**
संशोधक विदयार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विदयापीठ, औरंगाबाद. **महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना :**

राजर्षी शाहु महराजांची इ.स. १८९४ ते १९२२पर्यंतची म्हणजे अवघी अठ्ठाविस वर्षाची कारकीर्द आणि इतक्या कमी काळामध्ये महारांजानी केवळ कोल्हापूरच नाही तर सारा महाराष्ट्र बदलुन टाकला. राजर्षी शाहु महराज ज्या वेळी गादीवर आले त्यावेळी कोल्हापुर संस्थान हे पुर्ण दारिद्रयात आणि धार्मिक गुलामगीरीमध्ये होते. प्रत्येक व्यक्ती हा आपला व्यवसाय आपापल्या चौकटीत राहुनच करत असे,बापाचा व्यवसाय हा मुलाने करावा मुलाचा व्यावसाय त्यांच्या मुलांचे करावा अशी ही परंपरा चालत असे अधुनिकीकरणाने यांना थोडाही स्पर्श केलेला नाव्हता. हे सगळ चित्र महाराजांनी बघितल. समाजाची प्रगती कशी होईल याचा विचार महाराज करू लागले. यावेळी भारतावर इंग्रजांच राज्य होत. इंग्रज हे आधुनिक राज्यकर्ते होते. शिक्षणामुळे त्यांच्या देशाचा विकास घडवुन आणला हे महाराजांना माहीत होत. महाराज हे विदेश दौऱ्यावर गेल्यावर नितल निरक्षण करत असे. त्यांच्या विकासाच्या मागे शिक्षण हे आहे हे महाराजांनी पक्क ओळखल होत. म्हणुन आपल्या संस्थानात प्रथम शिक्षणाला प्राधान्य दयावे असे महाराजांना वाटले आणि त्यांनी त्या दिशेने वाटचाल सुरू केली. पण प्रजा ही शिक्षण घ्यायला तयार नव्हती म्हणुन महाराजांनी दमदार पाऊल उचलुन शिक्षण हे मोफत करून सक्तीचे केले.

**१. संस्थानातील शैक्षणिक चळवळ:**

राज्यकर्ता हा संयोजनशील ,गतिशिल आणि बहुजनहीतप्रवण असला तरच तो आपला राज्यकारभार समाजातील सर्व स्थरातील लोकांच्या सहाय्याने यशस्वीरीत्या चालु शकतो. हे सत्य माहीत असणारे राजर्षी शाहु महाराज होते.महाराजांनी प्रथम दुर्बल व निरक्षर बहुजनामध्ये शिक्षण प्रसार करव्याचे ठरवले. “महाराष्ट्रातील खेडयापाडयातील मागास व दलित वर्गामध्ये शिक्षण प्रसार करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय”.१. खेडयापाडया पर्यंत जीचे लोोन पाहचले होते अशी भारतातील पहिली सामाजिक चळवळ होय. सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा ज्योतीबा फुले यांनी या चळवळीला १८४८ साली प्रारंभ केला. महात्मा फुलेंनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे अशी विनंती ब्रिटिश सरकाला केली होती. पण इंग्रज हे स्वार्थी असल्याने त्यांनी भारतीयांकडे विशेष लक्ष दिले नाही. राजर्षी शाहु महाराजे हे महात्मा फुलेंना आदरस्थानी मानत असे.

राज्याची सुधारणा करणे म्हणजेच नैतिक आणि भौतिक प्रगती करणे यासाठी जनतेला शि्क्षण देणे जरूरीचे आहे. “ पुण्यातील ब्राहमण विद्वानानी वरीष्ठ वर्गाचे शिक्षण सुरू केल तर महात्मा फुले व शाहु छत्रपती यांनी मागासवर्गीय आणि दलितातील दलित यांच्यामध्ये शिक्षण प्रसार करव्यास आरंभ केला”२. संस्थानाच्या प्रशासनात बहुजनाना मोठया प्रमाणांत सहभागी करून घ्याव असे महाराजांना वाटत असे.पण बहुजन शिक्षित झाला तरच हे होणार आहे हे महाराजांना माहीत होते.

**२. प्राथमिक शिक्षण:**

आपल्या कोल्हापुर संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण सार्वांगीन करावे हा विचार महाराजाच्या मनात १९१२/१३ त्या दरम्यान आला होता. असे त्याकाळातील प्रशासकीय अहवलावरून स्पष्ट होते.

त्या अहवलावरून समजते की शिक्षण खात्याकडे महारांजाचे लक्ष पुर्वीपासुनच वेधलेले होते शिक्षण प्रसार करण्यासाठी जे प्रयत्न झाले जे महाराजांना समाधान फारक वाटत नव्हते म्हणुन या प्रगतीला चालना देण्याच्या हेतुने प्राथमिक शिक्षणाचा पाया विस्तृत करावा व प्राथमिक शिक्षण सर्वांना सुलभ सोपे करणे हे महाराजांना जरूरीचे वाटले. यासाठी महारांजांनी “शिक्षण सुधार समिती स्थापण केली.”३ बहुजन समाजाच्या शिक्षणसाठी कोण्त्या उपाय योजना कराव्यात यासाठी त्या महादेव गोंविद

रानडे, गोपाल कृष्ण गोखले,डॉ रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्याशी सल्ला मसलात केली. बहुजनांच्या सर्वागिण कल्याणचा विचार कसा होता हे महाराजांच्या पुढील विधानातुन स्पष्ट होताना दिसते " रयतेतील थोडासा भाग पुर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडातरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे"४ समाजातील सर्वाना शिक्षणाच्या लाभ झाला पाहिजे या हेतुने महाराजांनी बहुजनांच्या प्राथमिक शिक्षणावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रीत केले.बहुजनाना प्राथमिक शिक्षणाची थोडातरी अंश मिळावा म्हणुन महाराज नवनविन प्रयोग काळजीपुर्वक करत असे " अगदी प्रथम त्यांनी शाळेतील १५टक्के विदयार्थ्याना त्यांची फी पुर्णपणे माफ करण्याचा महत्वाचा निर्णय २० मे १९११ रोजी घेतला"५.परंतु या निर्णायाचा फायदा सुशिक्षित जाती मधील विदयार्थ्यानाच झाला हे लक्षात येताच महाराजांची १५ टक्के विदयार्थ्यामध्ये निम्मे विदयार्थी हे शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या वर्गातील असले पाहीजे असा नियम केला. प्रारंभी गावातील चावडी,देवळे धर्मशाळा इत्यादी ठिकाणी शाळा सुरू केल्या. " शाहु महाराज प्राथमिक शिक्षणावर एक लाख रूपये खर्च करत होते. "६.नंतर ही रक्कम तीन लाखावर गेली. त्याकाळी ही रक्कम खुप मोठी होती. कोल्हापुर सारख्या लहानशा संस्थानाने प्राथमिक शिक्षाणा सारख्या बाबीवर दरवर्षी एक लाख रूपये खर्च करणे म्हणजे खुप मोठी गोष्ट होती " त्या काळी प्राथमिक शिक्षकाचा पगार १२ रूपये होता"७ त्या मानाने ही रक्कम प्रचंड होती. त्या सुमारास महाराष्ट्र,कर्नाटक,गुजरात,सिंध इतक्या अफाट प्रदेशावर प्रसरलेल्या मुंबई इलाख्याची शिक्षणातील तरतुद एक लाख रूपये इतकी नव्हती.

प्राथमिक शिक्षण हेच कोणात्याही शिक्षण व्यवस्थेचा पाया असतो आणि एखादया इमारतीचा भिती असते.हे ओळखुन राजर्षी शाहु महाराजांनी प्राथमिक शिक्षणाकडे मोठया प्रमाणात लक्ष दिले.

**३. सक्तीचे शिक्षण:**

महात्मा फुलेप्रमाणेच शाहु महाराजांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षाणाचा आग्रह धारला. महाराजांनी कोल्हापुर राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले ही त्यांची योजना शिक्षण क्षेत्रातील मोठी योजना होती पण ही योजना जाचक होणार नाही याची सर्व खबरदारी महाराजांनी घेतली होती इ.स.२१ सप्टेबंर १९१७ रोजी शिक्षण तज्ज्ञांयाची समितीने तयार केलेल्या नियमावलीवर अधारीत असा सक्तीचे

शिक्षण कायदा खास जाहीरनामा काढुन प्रसिध्द करण्यात आला या जाहिरनाम्यात करवीर इलाख्यातील आमच्या सर्व प्रजाजनांना लिहीता,वाचता येउन आपली स्थिती ओळखुन सुधारण्यास समर्थ व्हावे म्हणुन असा कायदा केल्याचे म्हटले आहे”८ या कायदाने शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची आई बापावर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठवली नाही तर त्यांना प्रत्येकी एक रूपया दर महीना दंड करण्याची तरतुद करण्यात आली करवीर पेटयातील चिखली या गावात सक्तीचा पहील्या शाळेचा आरंभ. “ ४ मार्च १९१८ रोजी खुद शाहु छत्रपतीच्या शुभहस्ते झाला” ९.महाराजांना पुर्ण खात्री होती की शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची प्रगती झाली नाही अस इतिहास सांगतो म्हणुनच सक्तीच्या शिक्षणाची गरज आहे असे महाराजांना वाटत असे. १९१८ सालचा प्रारंभीच महाराजानी आपल्या संस्थानात सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी एक खास स्वतंत्र खाते निर्माण केले “त्यांवर डायरेक्टर आणि एज्युकेशनल इन्स्पेक्टर या वरीष्ट अधिकात्याची नेमणुक करण्यात आली तसेच हे खाते खुद्द आमच्या नजरेखाली राहील असे महाराजांनी जाहीर केले”१०.महाराजांना माहीत होते की सक्तीचे शिक्षण केले तर तीजोरीवर फार ताण पडणार आहे पण तरी ही महाराजांनी याची पर्वा केली नाही आणि सक्तीचे शिक्षण राज्यात लागु केले. महाराजांच्या प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे या योजनेचा चांगला परिणाम झालेला दिसुन येतो. कारण प्राथमिक शाळाची १८९३—९४ ला असलेली १८३ ही संख्या १९२१ ला ४९६ इतकी झाली. १८९३—९४ ला शिकणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या ११,०४२ होती ती १९२१—२२ ला २६,६२८ पर्यत वाढली तसेच “ सक्तीच्या व मोफत शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळाची संख्या १९१७—१८ ला २७ होती ती १९२१—२२ ला ४२० एवढी झाली विद्यार्थी संख्या ११२९६ वरून २२,००७ एवढी झाली”.११ प्रत्येक नाण्याला दोन बाजु असतात एक बाजु चांगली दुसरी वाईट या प्रमाणे या सक्तीच्या शिक्षणाविषयी झाले. तत्कालीन पुणेकरांनी या सक्तीच्या शिक्षणाला विरोध केलेला दिसुन येतो. विरोध करताना केलेला युक्तीवाद असा आहे की शिक्षणाचा विचार करण्यापुर्वी सध्या असलेल्या शिक्षणाच्या सोईमध्ये अधिक सुखसोई करणे आवश्यक आहे.केसरीने असे प्रतिपादन केले होते की “सध्याची शाळा गृहे प्रथम विस्तृत व हवेशीर केली पाहीजे त्यावर आधिक खर्च करण्याची गरज आहे”१२. शिक्षणाची मक्तेदारी आपल्या हातुन जाण्याच्या भितीमुळे वरिष्ठ वर्गाने अशी विधाने केलेली दिसते परंतु शाहु महाराजांनी या विरोधाला भिक घातली नाही दुबळया समाजाला पुढे आणुन पुढारलेल्या वर्गाच्या बरोबरीला आणुन

बसवव्याचे आपले प्रयत्न चालुच ठेवले राजर्षी शाहु महाराजांचा हा जो शिक्षण विषयक दृष्टीकोन होता तो आजही आपल्या समोर आदर्शच आहे.

## ४. सारांश :

राजर्षी शाहु महाराजांनी अठ्ठाविस वर्षात इतिहास बदलुन टाकला. राज्याची पाहणी केल्यावर समाज हा अडाणी अधंश्रध्दा धर्मभोळेपणा यातच गुंतलेला दिसला. यामुळे समाजाची प्रगती हि खुंटलेली होती पण,हे या समाजाच्या लक्षात येत नव्हते. समाजाला यातुन बाहेर काढायचे असेल तर शिक्षण हे खुप महत्वाचे साधन आहे हे महाराजांना माहीत होते. कारण महाराज हे इंग्रजांचे मांडलीक राजे होते इंग्रज हे आधुनिक विचार सरणीचे होते. पण या वेळेला समाजही शिक्षण घेण्यास उदासीन होता. कारण शिक्षण घेण हे आपल काम नाही अशी विचार सरणी या बहुजन समाजाची होती.म्हणुन सक्तीचे शिक्षण महाराजांना करावे लागले. तसा आदेशच महाराजांना काढावा लागला शिक्षण करून गैरहजर विद्‌यार्थ्यावर दंड आकारला गेला आई बापाला मदतीची गरज असेल तर पंधरा दिवसाची सुट्टी देण्यात येत असे, कोल्हापुर संस्थान हे एक छोटे संस्थान होते तरी ही महाराजांनी या छोटया संस्थानात प्राथमिक शिक्षणावर खुप मोठा खर्च केला. शिक्षणामुळे समाजाचा विकास होणार आहे हे महाराजांना पक्के माहीत होते खेडयापाडयात महाराजांनी शाळा सुरू केल्या. बहुजन समाज शिक्षणास तयार व्हावा यासाठी महाराज नवनविन प्रयोग करत असत. संस्थानात पन्नास टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या हे याचचे उदाहरण आहे म्हणजे समाजातील वंचित घटक शिक्षण घेण्यास तयार होईल महाराजांच्या सक्तीचे शिक्षण या योजनेला चांगला प्रतिसाद मिळालेला दिसतो कारण शाळा आणि विद्‌यार्थी संख्या खुप वाढली होती राजर्षी शाहु महाराज हे एक कर्ते सुधारक होते. हे येथे मान्य करावेच लागेल.

## संदर्भग्रंथ :

१. वाघ जितेंद्र शंकरराव,राजर्षी शाहु महाराजांचे अस्पृष्यांच्या संदर्भातील कार्य, (शांधनिबंध एमफील )यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ नासिक,२००९ पृ ९१

२. किर धनंजय, राजर्षी शाहु छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई आवृती ६ वी, २००१ पृ १४

३. लोकराज्य, सप्टेंबर २०१८, पृ १४

४. जाधव रमेश, लोकराजा शाहु छत्रपती, शैलेद्र प्रकाशन शुक्रवार पेठ पुणे, जुन २०१२ पृ १६४

५. जाधव रमेश, लोकराजा शाहु छत्रपती, कित्ता पृ १६५

६. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहु छत्रपती जीवन व कार्य अरूंधती प्रकाशन, कोल्हापुर २०१४ पृ ९८

७. निबांळकर सुवर्णा नाईक, समाज क्रांतीकारक राजर्षी शाहु महाराज, संस्कृती प्रकाशन, नारायण पेठ पुणे २०१४ पृ ३५

८. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहु स्मारकग्रथं, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापुर, आवृती ७ जुन २००७ पृ १२०

९. जाधव रमेश, लोकराजा शाहु छत्रपती, उपरोक्त क्र .४

१०. मठीकर दिलीप. रा, राजर्षी शाहु महाराज जीवन आणि कार्य, ललीतराज प्रकाशन, अहमदनगर २००५ पृ ५८

११. लोकराज्य सप्टेंबर २०१८. पृ १५

१२. जाधव रमेश, राजर्षी शाहु गौरव ग्रंथ, प्रकाशन महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय मुंबई २०१६ पृ ८३८